ePaper

मणिपूरमध्ये मुसळधार! जनजीवन विस्कळीत, 3 हजार नागरिकांचे स्थलांतर

|| वर्ष - 8 | अंक - 320 || UDYAM-MH-26-0158827 ||



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- स्मृती मानधनाची बॅट तळपली!
- मी गर्लफ्रेंडला टीम हॉटेलमध्ये आणायचो
- अंतराळातून भारत नेमका कसा दिसतो?
- समाजवाद शब्दांनी सनातनचा अवमान


www.mahaenews.com | रविवार |, दि. 29 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मुख्यमंत्र्यांसह भाजपच्या नेत्यांनी मांडली भूमिका : मराठीच सक्तीची, हिंदी नव्हे !

# ठाकरे बंधूंची भूमिका ‘सेम’, हे तर पुतना मावशीचे प्रेम!

## ठाकरे बंधूंच्या मोर्चाला मिळत आहे प्रतिसाद, काँग्रेस, शरद पवार गटही होणार सामील !

| मुंबई | महाईन्यूज

**महाराष्ट्रात होत असलेल्या हिंदी सक्तीच्या विरोधात उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी आयोजित केलेल्या दि. ५ जुलैच्या मोर्चाला प्रचंड प्रतिसाद मिळत असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे अन्य नेते आता आक्रमक झाले असून महाराष्ट्रामध्ये ‘मराठीचीच सक्ती आहे, हिंदीची नाही’ असे ठणकावून सांगत आहेत. ठाकरे बंधूंचे मराठी प्रेम, हे ‘पुतना मावशीचे प्रेम’ असल्याचा आरोप भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केला आहे.**



### केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून...

महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्था आणि महानगरपालिकांच्या निवडणुका होत असून त्या डोळ्यासमोर ठेवून सर्व विरोधकांचे मराठी प्रेम ऊतू चालले आहे. निवडणुका नसत्या तर हे विरोधक एवढे आक्रमक झालेच नसते. चुका केल्या यांनी, आम्ही दुरुस्त केल्या पण ‘फेक नॅरेटिव्ह’ पसरवून मते मिळवायची, हा यांचा उद्योग झाला आहे. जनता एकदा फसली आता फसणार नाही, अशी टोलेबाजी देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

### शरद पवार यांचे आदेश..

दरम्यान, ठाकरे बंधूंच्या मराठीसाठीच्या एल्गार मोर्चामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस मधील शरद पवार गट सहभागी होणार असल्याचे स्वतः शरद पवार यांनी स्पष्ट केले. तर ‘महाविकास आघाडी’ मधील काँग्रेस देखील मोर्चामध्ये सहभागी होणार आहे. हा मोर्चा अभूतपूर्व असाच होईल आणि सरकारला हिंदी सक्ती मागे घेण्यास भाग पाडेल, असे उबाठा गट आणि मनसे च्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले आहे.

### फडणवीस यांची भूमिका

दरम्यान, महाराष्ट्रात हिंदी भाषेची सक्ती होत आहे, असा आरोप करत उबाठा गट आणि मनसे यांनी पक्षविरहित मोर्चाची घोषणा केली आहे. उद्धव ठाकरे ज्यावेळी मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाला पाठिंबा दिला होता. आता सत्ता नसताना विरोधात बसल्यावर ते विरोध करत आहेत, हे काही त्यांचे मराठी प्रेम नाही, असा आरोप फडणवीस यांनी केला आहे.

### हिंदी हा तर पर्यायी विषय!

महाराष्ट्रात मराठीची सक्ती आहे, हिंदीची सक्ती नाही. हिंदी पर्यायी विषय आहे. हिंदी किंवा कोणतीही भाषा शिकता येईल, असा पर्याय दिला आहे. नव्या शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्र आहे, ते आपण स्वीकारले आहे. ‘एनईपी-२०२०’ हे धोरण आले, त्यावेळी महाराष्ट्रात ‘महाविकास आघाडी’ चे म्हणजेच उद्धव ठाकरेंचे सरकार होते. उद्धव ठाकरेंच्या सरकारने यावर अभ्यास करुन नीती ठरवण्यासाठी एक समिती नेमली.

### समितीच्या अध्यक्षपदी डॉ. माशेलकर

या समितीचे अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर होते. डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. सुखदेव थोरात अशा ज्येष्ठ तज्ज्ञांसह १८ सदस्य समितीमध्ये होते. या समितीने एक अहवाल तयार केला आणि तो उद्धव ठाकरेंच्या सरकारला २०२१ मध्ये दिला. २०२१ मध्ये उद्धव ठाकरेंच्या सरकारने तो अहवाल स्वीकारला. त्यानंतर पुढील कारवाई झाली. या अहवालात तीन भाषा सूत्र सांगितले आहे. मराठीसोबत इंग्रजी आणि हिंदी सक्तीची करा. हे उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्ये झाले आहे. उद्धव ठाकरेंनी हे सांगितले आहे, की वेगवेगळ्या भाषा शिकल्या पाहिजेत. आता असा अहवाल आहे. डॉ. मुणगेकर, डॉ. माशेलकर, थोरात यांनी तो अहवाल दिला होता, त्यांना तुम्ही महाराष्ट्रद्रोही ठरवणार आहात का? असा सवाल फडणवीस यांनी केला.

### विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीच धोरण

नवे धोरण ही एक शास्त्रीय प्रक्रिया आहे. आपले विद्यार्थी पुढे गेले पाहिजेत, यासाठी हे सूत्र तयार करण्यात आले आहे. ते तयार करताना विद्यार्थ्यांच्या मेंदूमध्ये भाषा शिकण्याची क्षमता कधी असते, याचे संशोधन केले गेले आहे. अधिकच्या भाषा विद्यार्थी शिकू शकतात. हा काही आमच्यासाठी प्रतिष्ठेचा मुद्दा नाही. आम्ही एका मिनिटात सांगितले कोणतीही भाषा शिका. प्रश्न हिंदी सक्तीचा नाही, हिंदीला विरोधाचा आहे. यांचा हिंदीला विरोध आहे.

### गंमत म्हणजे, इंग्रजीला विरोध नाही!

फडणवीस म्हणाले, की मला आश्चर्य एका गोष्टीचे वाटते, भारतात तुमचा इंग्रजीला विरोध नाही. यांच्यापैकी एकानेही इंग्रजीला विरोध केलेला नाही. भारतीय भाषा असलेल्या हिंदीला विरोध करण्यात येत आहे. हा विरोधाभास आहे. मराठी आणि हिंदी स्पर्धा आली तर आधी मराठी. मराठी आमची मायबोली आहे, त्यामुळे सक्तीची मराठीच. पण, आमच्या मुलांना तीन भाषा शिकायच्या असतील, तर हरकत काय? तीन भाषा शिकल्या नाहीत, तर त्या विषयाचे क्रेडिट मिळणार नाही. चांगले टक्के मिळवूनही क्रेडिटचे मार्क दुसऱ्याजवळ जास्त असल्याने त्याला तो प्रवेश मिळेल, असे ही देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे.

### भाजपा प्रवक्त्याची टीका

दरम्यान, भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली आहे. ‘हे तर पुतना मावशीचे प्रेम आहे. उद्धव ठाकरे यांनी मराठी सक्तीच्या ‘जीआर’ची होळी करण्याचा आदेश दिला आहे. मराठी सक्ती सांगणाऱ्या जीआरची होळी? हे यांचे मराठी प्रेम ? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना उर्दू भवनची घोषणा केली, त्यावेळी मराठी शाळांच्या दुरवस्थेची आठवण आली नाही का?

### मुंबईतील मराठी शाळा बंद

मुंबई महानगरपालिकेमध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना वर्षानुवर्षे सत्तेवर होती. मुंबई महापालिकेच्या मराठी शाळांची संख्या गेल्या १५ वर्षात ४०० वरून २८० पर्यंत खाली आली. याच शाळांतील विद्यार्थी संख्याही लाखांहून ३५ हजारांवर आली. काही शाळा बंद कराव्या लागत आहेत. कुठे गेले उद्धव ठाकरे यांचे मराठी प्रेम ?’, असे केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे. सांगण्यासारखा आणखी एक मुद्दा म्हणजे शरद पवार गटाने २०२० मध्ये ‘हिंदी भाषा जोडो अभियान’ केले होते, त्याचे उद्घाटन त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले होते.

# तिसऱ्या भाषेचा पर्याय पाचवीपासून असावा!

## पहिलीपासून मातृभाषा आणि पाचवीपासून तिसऱ्या भाषेचा पर्याय

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पहिलीपासून मातृभाषा आणि पाचवीपासून तिसऱ्या भाषेचा पर्याय असावा. पाचवीनंतर कोणती भाषा घ्यायची, हे पालकांनी ठरवावे,' अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूक निकालानंतर झालेल्या जाहीर सभेनंतर पत्रकारांशी बोलताना अजित पवार म्हणाले, 'अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे.**



त्या बैठकीत या विषयावर चर्चा केली जाणार आहे. पहिलीपासून मातृभाषा असली पाहिजे, याबाबत दुमत नाही. मात्र, इतर भाषांचा समावेश पाचवीपासून करण्यात यावा. मराठी भाषा सक्तीची आहे. पाचवीनंतर कोणती भाषा घ्यावी, हे पालकांनी ठरवावे.'बीडमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाल्याच्या प्रकरणाबाबत पवार म्हणाले, 'याबाबत पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.'माळेगाव' निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केली. मात्र, तावरे यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून सहा जागांची मागणी करण्यात आली. त्या पक्षाचे तालुकाध्यक्ष एस. एन. जगताप आले होते. त्यांना दोन जागा देण्याची तयारी दर्शविली होती. तसेच एक स्वीकृत संचालक नेमण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सहमती दर्शवली होती.

मात्र, राजवर्धन शिंदे यांनी असहमती दर्शविली. ते नवीन मुद्दे काढू लागल्याने निवडणूक घ्यावी लागली, असे अजित पवार यांनी सांगितले.'माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत टोकाची भूमिका घेतली नव्हती. मला संचालक किंवा अध्यक्ष व्हायचे नव्हते. मात्र, अध्यक्षपदासाठी सहा ते सात जण इच्छुक असल्याने अध्यक्षपदासाठी माझे नाव जाहीर करावे लागले,' असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. त्या बैठकीत या विषयावर चर्चा केली जाणार आहे. पहिलीपासून मातृभाषा असली पाहिजे, याबाबत दुमत नाही. मात्र, इतर भाषांचा समावेश पाचवीपासून करण्यात यावा. मराठी भाषा सक्तीची आहे. पाचवीनंतर कोणती भाषा घ्यावी, हे पालकांनी ठरवावे.'बीडमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाल्याच्या प्रकरणाबाबत पवार म्हणाले, 'याबाबत पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.'माळेगाव' निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केली. मात्र, तावरे यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून सहा जागांची मागणी करण्यात आली. त्या पक्षाचे तालुकाध्यक्ष एस. एन. जगताप आले होते. त्यांना दोन जागा देण्याची तयारी दर्शविली होती. तसेच एक स्वीकृत संचालक नेमण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सहमती दर्शवली होती. मात्र, राजवर्धन शिंदे यांनी असहमती दर्शविली. ते नवीन मुद्दे काढू लागल्याने निवडणूक घ्यावी लागली, असे अजित पवार यांनी सांगितले.'माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत टोकाची भूमिका घेतली नव्हती.

### मला अध्यक्ष व्हायचे नव्हते

मला संचालक किंवा अध्यक्ष व्हायचे नव्हते. मात्र, अध्यक्षपदासाठी सहा ते सात जण इच्छुक असल्याने अध्यक्षपदासाठी माझे नाव जाहीर करावे लागले,' असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. पहिलीपासून मातृभाषा आणि पाचवीपासून तिसऱ्या भाषेचा पर्याय असावा. पाचवीनंतर कोणती भाषा घ्यायची, हे पालकांनी ठरवावे,' अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूक निकालानंतर झालेल्या जाहीर सभेनंतर पत्रकारांशी बोलताना अजित पवार म्हणाले, 'अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. राजवर्धन शिंदे यांनी असहमती दर्शविली. ते नवीन मुद्दे काढू लागल्याने निवडणूक घ्यावी लागली, असे अजित पवार यांनी सांगितले.

# अन्नधान्य वाहतूकदारांचा बेमुदत बंदचा इशारा

## 1 जुलैपासून जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक बंद

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहतूक पोलिसांकडून माल वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर कारवाई करण्यात येत असल्याच्या निषेधार्थ अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांची वाहतूक करणाऱ्या गाड्या १ जुलैपासून बेमुदत बंद ठेवणार असल्याचा इशारा दि पूना डिस्टीक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनने दिला आहे.**



शहराच्या मध्यभागात असलेल्या नाना पेठ, भवानीपेठ, गणेश पेठेतील भुसार बाजार, तसेच मार्केट यार्डातील भुसार बाजारात अन्नधान्य वाहतूक करणाऱ्या ट्रक, टेम्पोवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. शहरातील विविध रस्त्यावर जड वाहनांवर वाहतूक पोलिसांनी बंदी घातली आहे. जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर वाहनांवर कारवाई केली जात असल्याने अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांची वाहतूक करणारी वाहने बेमुदत बंद ठेवण्यात येणार असल्याचा इशारा दि पूना डिस्टीक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनने दिला आहे. याबाबत दि पूना डिस्ट्रिक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनची सभा नुकतीच झाली.

याबाबत त्यांनी व्यापारी संघटनांना पत्र दिले आहे. शहरातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख रस्त्यांवर दिवसा जड वाहनांवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. निर्बंधामुळे पुणे शहरात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे भाववाढ होऊन त्याची झळ सामन्यांना सोसावी लागणार आहे.जीवनावश्यक वस्तूंचा व्यवसाय करणारे व्यावसायीक, हमाल कामगार तसेच अन्य घटकांवर परिणाम होणार आहे. जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या गाड्यांना सूट देण्यात यावी. हा प्रश्न तातडीने मार्गी लावणे, तसेच वाहतूकदारांच्या मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, कृषी उपन्न बाजार समितीतील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी. याप्रश्नी तोडगा काढण्यात यावा, अशी मागणी मार्केट यार्डातील भुसार बाजारातील व्यापाऱ्यांची शिखर संघटना असलेल्या दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष रायकुमार नहार यांनी केली आहे.शहराच्या मध्यभागात असलेल्या नाना पेठ, भवानीपेठ, गणेश पेठेतील भुसार बाजार, तसेच मार्केट यार्डातील भुसार बाजारात अन्नधान्य वाहतूक करणाऱ्या ट्रक, टेम्पोवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. शहरातील विविध रस्त्यावर जड वाहनांवर वाहतूक पोलिसांनी बंदी घातली आहे. जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर वाहनांवर कारवाई केली जात असल्याने अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांची वाहतूक करणारी वाहने बेमुदत बंद ठेवण्यात येणार असल्याचा इशारा दि पूना डिस्टीक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनने दिला आहे.

### झळ सामन्यांना सोसावी लागणार

याबाबत दि पूना डिस्ट्रिक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनची सभा नुकतीच झाली. याबाबत त्यांनी व्यापारी संघटनांना पत्र दिले आहे. शहरातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख रस्त्यांवर दिवसा जड वाहनांवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. निर्बंधामुळे पुणे शहरात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे भाववाढ होऊन त्याची झळ सामन्यांना सोसावी लागणार आहे.

## डीबीटी’च्या माध्यमातून 15 हजार

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध !

### पिंपरी-चिंचवड मनपा शिक्षण विभागाची यशस्वी अंमलबजावणी

। पिंपरी चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळा दिनांक १६ जून रोजीपासून उत्साहात सुरु झाल्या. पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप सुध्दा करण्यात आले. सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटपासाठी थेट लाभ हस्तांतरण (DBT) उपक्रमातून शालेय व आवश्यक साहित्यांचे वाटप सुरु केले असून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळाला असून शाळांकडून साहित्याच्या किटचे यशस्वीपणे वितरण करून एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने, डिजिटल ई-रूपी पेमेंट प्रक्रिया राबविल्यामुळे साहित्य वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन सदर प्रक्रिया जलदपणे राबविण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने थेट लाभ हस्तांतरण उपक्रमातून साहित्यांचे वाटप करण्यासाठी शहरातील वितरकांची नेमणूक केली असून त्यांच्याकडून डिजिटल ई-रुपी पेमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना साहित्य उपलब्ध होत आहे. शाळा सुरु होऊन आता १२ इतके दिवस झाले असून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना साहित्य मिळाले आहे. अद्यापही विद्यार्थी व पालकांकडून साहित्य घेण्याची प्रक्रिया सुरु असून यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध होईल. यामध्ये क्यू आर कोड द्वारे साहित्य वाटप केली असून तब्बल ४ कोटी रुपयांच्या साहित्याचे महापालिकेने विद्यार्थ्यांना वाटप केल्याचे शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगिता बांगर यांनी माहिती देताना स्पष्ट केले.

> “चालू शैक्षणिक वर्षामध्येसुध्दा ‘डीबीटी’च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आमच्या विद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेचे साहित्य पुरवता आले आहे. ई-रूपी सारख्या डिजिटल पेमेंट प्रक्रियेमुळे निधीचा कार्यक्षमतेने वापर करण्यात आला असून याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. गतवर्षी यशस्वी झालेल्या उपक्रमामुळे चालू वर्षीसुध्दा प्रत्येक विद्यार्थ्याला लाभ घेता येत असून यापुढेही एकही विद्यार्थी सदर साहित्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत.”
> - **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

## संत तुकारामनगरला होणार नवीन ‘ह’ क्षेत्रीय कार्यालय

### हरित इमारत बांधण्यात येणार : लवकरच निविदा प्रसिद्ध होणार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महापालिकेकडे इंडस्ट्रियल टू रेसिडेन्सियल (आयटूआर) अंतर्गत संत तुकारामनगर मेट्रो स्टेशनच्या समोरील आयसीसी देवी टॉवर शेजारील जागा उपलब्ध झाली आहे. त्या ठिकाणी ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयाची नवीन हरित इमारत (ग्रीन बिल्डींग) उभारण्यात येणार आहे. लवकरच त्याची निविदा प्रसिद्ध करण्याचे नियोजन आहे..**



आयआर’ अंतर्गत तेथील जागा महापालिकेच्या ताब्यात आली आहे. तेथे ‘ह’ क्षेत्रीय कार्यालय बांधण्यात येणार आहे. त्यासाठी ३ ऑक्टोबर २०२४ ला ५२ कोटी रूपये निधीस मंजुरी देण्यात आली आहे. अर्थसंकल्पात २ कोटी ५८ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. इमारत उभारण्यास आयुक्तांनी २८ ऑक्टोबर २०२२ ला मंजुरी दिली आहे. त्या इमारतीचे डिझाईन करण्यासाठी ज्योती पानसे असोसिएटस या आर्किटेक्टची नियुक्ती ९ जुलै २०२४ ला करण्यात आली आहे. त्यांनी २२ मे २०२४ ला आयुक्तांच्या दालनात त्यासंदर्भातील सादरीकरण केले. १८ मार्च २०२५ च्या बैठकीत ती इमारत ग्रीन बिल्डींग करण्यात यावी, सोलर पॅनेल लावण्यात यावेत, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. त्यामुळे इमारतीच्या खर्च ५२ कोटींवरून ६० कोटींवर गेला आहे.

#### इमारत उभारणीच्या वाढीव खर्चाला दिली मान्यता

क्षेत्रीय कार्यालयाची ग्रीन इमारत उभारण्यासाठी वाढीव खर्चास पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच इमारती कामाची निविदा प्रसिद्ध करण्याचे नियोजन असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

#### मेट्रो स्टेशननजीकची जागा झाली उपलब्ध

‘ह’ क्षेत्रीय कार्यालयाच्या उभारणीसाठी पिंपरीतील संत तुकारामनगर येथील मेट्रो स्टेशनच्या समोरील आयसीसी देवी टॉवर शेजारील जागा महापालिकेस उपलब्ध झाली आहे.

## अबब! पालिकेचा हार, फुले, नारळांवर ७० लाख खर्च




। पिंपरी ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कार्यक्रमांसाठी हार, फुले, गुच्छ, नारळ आदी साहित्य खरेदी केले जात आहे. दीड वर्षातील कार्यक्रमांसाठी उद्यान विभागाकडून हार व फुले खरेदीसाठी तब्बल ७० लाखांचा खर्च करण्यात आला आहे.

हार, फुले, गुच्छ, नारळ आदी साहित्य उद्यान विभागाकडून खरेदी केले जाते. त्यासाठी उद्यान विभागाने निविदा प्रसिद्ध केली होती. ते ३९ लाख ४९ हजार २५० रुपये खर्चाचे काम ‘श्री लक्ष्मी फ्लॉवर अ‍ॅण्ड डेकोरेशन’ या एजन्सीला देण्यात आले. हार व फुले पुरवठयाची मुदत १ मार्च २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२५ अशी दीड वर्ष होती. मात्र, ३१ जानेवारी २०२५ पर्यंत ३९ लाख ४९ हजार २५० रुपयांचा खर्च झाल्याचा दावा उद्यान विभागाने केला आहे. निविदेतील सात महिन्यांचा कालावधी अद्यापि शिल्लक आहे. त्यामुळे हार व फुले खरेदीसाठी आणखी ३० लाख रुपये खर्च असल्याचा नवा प्रस्ताव उद्यान विभागाने दिला होता. त्या वाढीस प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समिती सभेत मंजुरी दिली.

# निमित्त मोर्चाचे..संधी मात्र, विरोधकांना एकत्र येण्याची !

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



## परमार्थ हे कृतीचे शास्त्र आहे.

एकदा जनक राजाच्या घरी एक विद्वान् आला, आणि आपण आल्याची वर्दी त्याने राजाला पाठविली. ‘ आता राजा आपली पूजा करील ’ असे त्याच्या मनात आले. हा त्याचा भाव समजून जनक राजाने निरोप पाठविला की, ‘ आपण एकटेच यावे. ’ त्याप्रमाणे, आपण अभिमानाचे गाठोडे बाहेर ठेवून मगच रामाकडे जावे; तसेच सद्गुरूच्या घरीही आपले भांडवल बाजूला ठेवूनच जावे. ‘ मी कोण ’ याची जाणीव जोपर्यंत राहते तोपर्यंत दुजेपण आलेच. अभिमान वाढविण्याकरिता देवाकडे नाही जाऊ. दुसऱ्याचे वाईट व्हावे असे आपल्याला वाटले की आपला अभिमान वाढीला लागला आहे असे जाणावे. पोरांबाळांवर जितके प्रेम करता तितके प्रेम भगवंतावर करावे. आपली आणि भगवंताची इच्छा एकच होणे, हे परमार्थाचे सूत्र आहे. भगवंताची जी इच्छा तीच आपली करावी, आणि आनंदात रहावे. अगदी नि:स्वार्थबुद्धीने केलेले कर्तव्य कधी वाया जात नाही. एखाद्या सावकाराकडे कोणाचे दागिने गहाण असले, तर त्याने आपल्या घरच्या लग्नामध्ये ते वापरणे हा अन्याय आहे. त्याचप्रमाणे, आपली मुलेबाळे ही देवाने आपल्याजवळ दिली आहेत, त्यांचे रक्षण करावे; ते कर्तव्य होईल. पण त्यांच्या ठिकाणी आपलेपणा ठेवून सुखदु:ख भोगणे हे मात्र पाप आहे. संन्याशाने भगवे वस्त्र धारण केल्यावर त्याचा थोडा तरी परिणाम बुद्धीवर होतोच. त्याचप्रमाणे आपण भजनपूजन करू लागल्यावर त्याचा परिणाम आपल्यावर दिसला पाहिजे. जो शहाणा असेल त्याने समजून, आणि जो अडाणी असेल त्याने श्रद्धेने, बंधने पाळावीत. स्वत:च्या मताबद्दल आपल्याला पूर्ण खात्री असावी, त्यात घोटाळा असू नये. मनाने आपण खंबीर झाले पाहिजे. ज्याप्रमाणे पांढरा कपडा मळण्याचा जास्त संभव असतो, त्याप्रमाणे सत्कर्माला विघ्ने फार येतात; त्यांना न जुमानता आपण सत्कर्म करावे. आचार आणि विचार ही दोन्ही जुळली म्हणजे उच्चारही तसाच येतो.

नारळात पाणी जितके गोड तेवढी खोबऱ्याला चव कमी; तसे, जेवढी विद्वत्ता जास्त तेवढी निष्ठा कमी. फार वाचू नका; जे काही थोडे वाचाल त्याचे मनन करा; आणि ते कृतीत आणा. जसे वडिलांचे पत्र वाचल्यावर आपण त्यातल्या मजकुराप्रमाणे कृती करतो, तशी ग्रंथवाचनाच्या समाप्तीनंतर कृतीला सुरुवात करावी. परमार्थ हे सर्वस्वी कृतीचेच शास्त्र आहे. समाधान आणि आनंद हे त्या शास्त्राचे साध्य आहे. भगवंताच्या स्मरणात कर्तव्य केले की जीवनात आनंद उत्पन्न होतो.

बोधवचन:- सर्व काही करावे। पण खरे प्रेम साधनावर असावे॥



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**महाराष्ट्रातील बहुतेक राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते थोडक्यात किंवा अल्पकालीन मिळणाऱ्या फायद्याच्या नादात दीर्घकालीन तोटे विसरतात आणि नंतर मतदारांकडून फटके खातात. महाराष्ट्रात राज आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षांनी एकत्र येऊन मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला खरा, तोदेखील हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात! ही सक्ती असावी की, युक्तीने भाषा शिकवावी, हा निर्णय वास्तविक पालकांनी घ्यायचा आहे.**



### मोठ्या क्रांतीची अपेक्षा का?

यामुद्द्या बाबत मतमतांतरे असू शकतात. पण, एक भलामोठा मोर्चा काढून फार मोठी राजकीय क्रांती होईल किंवा कसे, हे मोर्चा काढणाऱ्यांनी लक्षात घ्यावे. मोर्चात केलेली मागणी लक्षात घेऊन कदाचित सरकार ही सक्ती वगैरे बाजूला ठेवू शकते. पण, पुढील निवडणुकीत मतदारांना ते मान्य होईल का? महाराष्ट्रात आता संयुक्त विरोधी पक्ष होण्याची होड सुरु झाली आहे की काय ? एका दृष्टीने भाजपा आणि मंडळींना दूर ठेवण्यासाठी विरोधकांना एकत्र येण्याची संधी मात्र आहे !

### प्रथम नाव कोणाचे घेणार ?

महाराष्ट्रामध्ये जेव्हा भारतीय जनता पार्टी आणि अखंड शिवसेना यांची ‘युती’ होती, तेव्हा आधी कोणाचे नाव घ्यायचे हाही मुद्दा असे. अशी अनेक उदाहरणे आढळतात. संगीतकार अजय - अतुल हे सख्खे भाऊ. अजयचे नाव पहिले येत असले तरी तो धाकटा भाऊ आहे. अंगापिंडाने तो मोठा असला तरी शाब्दिक दादागिरी अतुलची ! दोघेही छान संगीत देतात. “ गुन गुन गुना रे “ एवढे एक गाणे ऐकले, तरी याची प्रचिती येईल. तशीच थोडीशी परिस्थिती ठाकरे बंधू यांची आहे. ताकद उद्धव ठाकरे यांची अधिक असली, तरी आवाज मात्र राज यांचा मोठा आहे. दोघांनी एकत्र येऊन महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् केला तर नको कोण म्हणणार आहे ? किंबहुना, महाराष्ट्राची तीच अपेक्षा आहे !

### सत्ताधाऱ्यांना विरोध, हाच मुद्दा!

दुसरा मुद्दा असा, की मोर्चाच्या निमित्ताने ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी ठाकरे बंधू यांना पाठिंबा देणे किंवा काँग्रेस पक्षाने देखील समर्थन देणे हे मनोरंजक आणि बरेचसे गंमतीशीर वाटते. सत्ताधारी आघाडी ला विरोध एवढा एकच संयुक्त मुद्दा.. पण, त्यातून एक अगतिकता दिसून आली आणि ती म्हणजे मुख्य विरोधी पक्ष म्हणून महाराष्ट्रात आधी आपली मांड बसवावी आणि मग आगामी निवडणुकीत आपली ताकद दाखवावी, एवढा साधा विषय आहे.

### महाराष्ट्रात राजकीय परिस्थिती वेगळी

पण, येथे परिस्थिती वेगळी दिसते. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे १३ जागा जिंकल्यानंतर हा महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष झाला असे मानले गेले. मग, ‘महाआघाडी’ त काँग्रेसला लढविण्यासाठी सर्वाधिक जागा मिळाल्या. पण दुर्दैव असे की जेवढ्या लोकसभेत मिळाल्या, जवळपास तेवढ्याच विधानसभेत मिळाल्या.

### दिल्लीतून पाठवलेला नेता अपयशी..

प्रचंड अपयश पदरी पडल्यानंतर आता तो ईव्हीएम घोटाळा वगैरे सांगत राहुल गांधी यांनी देशभर पक्षाची फरपट करुन घेतली, तशी महाराष्ट्रात काँग्रेसची सुरु झाली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नावाचे आहेत, पण पक्षाचे वर्धन काही होताना दिसत नाही. याचे कारण म्हणजे दिल्लीतून नेमले गेलेले काँग्रेसचे मुख्यमंत्री यशस्वी होत नाहीत, तर प्रदेशाध्यक्ष यशस्वी होण्याची सुतराम शक्यता नाही. ग्रामीण भागातून एखादे नेतृत्व उभे राहिले असते, तर कदाचित काँग्रेसला बरे दिवस आले असते. पण, हातामध्ये १३ खासदार असून पक्षाला राज्यात त्यांचा जवळपास काही उपयोग नाही.

### राजकीय ताकद वाढवण्यासाठी..

थोडक्यात काय, कोणताही एक पक्ष महाराष्ट्रात मुख्य विरोधी पक्ष होण्याच्या परिस्थितीत नाही. एकमेकांना टेकू लावत दिवस ढकलून कोणताही राजकीय पक्ष मोठा होऊ शकत नाही. एखाद्या भाषेची सक्ती हा विषय दक्षिणेकडील राज्यांमध्ये कदाचित संवेदनशील असू शकतो. पण, महाराष्ट्रात त्या विषयावर मोर्चा काढून फार मोठा राजकीय लाभ होईल, ही कल्पना फारशी पटणारी नाही. फक्त या निमित्ताने एकमेकांच्या बरोबर फरपटत जाऊन आपली स्वतःची ताकद वाढविण्याच्या मर्यादा राजकीय पक्षांनी तयार करुन घेतल्या आहेत.

### ‘समविचार’ हा एकच धागा..

ठाकरे बंधूंच्या मोर्चामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व पक्षांचा आणि त्यांच्या नेत्यांचा एकच समविचार आहे आणि तो म्हणजे सत्तेवर असणाऱ्या ‘महायुती’ला हटवणे! त्यासाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांना ‘फेक नॅरेटिव्ह’ हवा आहे आणि तो मराठी-हिंदी वादामध्ये त्यांना मिळाला आहे. याचा अचूक फायदा उचलून ‘महायुती’ला बदनाम करण्याची संधी हे मोर्चावाले दवडणार नाहीत. एकत्र आल्यामुळे त्यांची ताकद नक्की दिसणार आहे, त्याला आता सत्ताधारी ‘महायुती’ कशाप्रकारे हाताळते, हे आता पाहण्यासारखे आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हिंदी सक्तीच्या निर्णयाची आज होळी!

## अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला ठाकरे गटासह विरोधी पक्ष आक्रमक

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हिंदी सक्तीच्या शासन निर्णयाविरोधात सर्व विरोधी पक्ष एकवटले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंदी सक्तीविरोधात राज्यभर रविवार २९ जून रोजी या शासन निर्णयाची होळी करण्याचे आदेश दिले आहेत. मुंबईत वांद्रे तसेच दादरमध्ये या शासन निर्णयाची होळी केली जाणार आहे. त्यांच्या या आंदोलनात काँग्रेससह अन्य विरोधी पक्षही सहभागी होणार आहेत. दुसरीकडे ५ जुलै रोजीच्या आंदोलनाची जोरदार तयारी सुरू असून त्यासाठी शिवसेना (ठाकरे) आणि मनसेकडून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार रविवारी आझाद मैदानाजवळ मुंबई मराठी पत्रकार संघ परिसरात शासन निर्णयाची होळी करण्यात येणार असून या आंदोलनाला स्वत: उद्धव ठाकरे, संजय राऊत, मनसेचे नितीन सरदेसाई आदी उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे मुंबईत ठिकठिकाणी शासन निर्णयाची होळी करण्यात येणार असून दादर येथील प्रबोधनकार ठाकरे चौक आणि वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत शासन निर्णयाची होळी केली जाणार आहे.हिंदी सक्तीविरोधातील ५ जुलै रोजीच्या आंदोलनाच्या तयारीसाठी शिवसेना नेते खासदार संजय राऊत, अनिल देसाई, वरूण सरदेसाई तर मनसेकडून बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या आंदोलनाच्या तयारीसाठी दोन्ही पक्षांच्या नेत्यांची भेठीगाठी वाढल्या आहेत. गुरुवारी मनसे नेते संदीप देशपांडे आणि शिवसेना आमदार वरुण सरदेसाई यांची भेट झाल्यानंतर शनिवारी पक्षाचे नेते बाळा नांदगावकर आणि माजी मंत्री अनिल परब यांची भेट झाली. या भेटीतही ५ जुलैच्या मोर्चाची नियोजनाबाबत चर्चा झाली.काही वर्षांपूर्वी त्रिभाषा पद्धतीतून शिक्षण घेणारे आज या विषयावरून वावटळ उठवत असतील, तर त्यांना त्रिभाषा सूत्रावर बोलण्याचा कुठलाही अधिकार नाही, असा टोला शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी ठाकरे बंधुंना हाणला. त्रिभाषा सूत्रावरून राज्यात काहूर उठले असताना शिक्षणमंत्री भुसे यांनी येथे पत्रकार परिषदेत मराठीतून शिक्षण घेणाऱ्यांनाच या विषयावर बोलण्याचा नैतिक अधिकार असल्याचे सांगितले. हा व्यक्तिगत प्रतिष्ठेचा विषय नसून त्यावर अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील, असे ते म्हणाले.त्रिभाषा सूत्र धोरण देशात जम्मू काश्मीर, लडाख यांनी इयत्ता पहिलीपासून तर, तिसरीपासून मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात, उत्तराखंड आणि सिक्कीम यांनी स्वीकारले आहे. महाराष्ट्रातही इयत्ता पहिली आणि दुसरीत केवळ मौखीक म्हणजे बडबडगीते, चित्रमय स्वरुपात शिक्षण दिले जाणार होते. त्यासाठी पुस्तकही प्रकाशित नाही. इयत्ता तिसरीपासून पुस्तक स्वरुपात हा विषय राहणार असल्याचे भुसे यांनी नमूद केले.तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील कृती समितीचा अहवाल स्वीकारला होता, याकडे भुसे यांनी लक्ष वेधले. राज्यात इयत्ता पाचवीपासून त्रिभाषा सूत्र आहे. असे असतानाही २० ते २५ टक्के अन्य माध्यमांच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्रानुसार अनेक वर्षांपासून शिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सूचित केले.

### भुसे यांच्याकडून ठाकरे बंधू लक्ष्य

**त्रिभाषा सूत्रासंदर्भात साहित्यिकांशी संवाद साधला जाईल. राज्यातील सीबीएसई आणि इतर मंडळांच्या सर्व शाळांमध्ये मराठी शिकविणे बंधनकारक करण्यात आले.त्रिभाषा सूत्राचा निर्णय महाविकास आघाडीच्या काळातच घेण्यात आला असा आरोप सत्ताधारी महायुतीकडून केला जात असतानाच, हिंदी सक्तीचा शासन निर्णय महाविकास आघाडी सरकारने काढला होता का असा सवाल शिवसेना नेते व माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी केला आहे. आमच्या सरकारने प्रत्येक शाळेत मराठी भाषेची सक्ती केली होती. हिंदी भाषा लादण्याचे किंवा तिसरी भाषा लादण्याचे काम भाजपवाल्यांनी केले आहे. हिंदी सक्ती वा त्रिभाषा सूत्राचा शासन निर्णय रद्द करीत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असा इशारा त्यांनी दिला.**

# राज्यातील पतसंस्थांची क्यूआर कोड सेवा बंद

## रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाने राज्यातील ग्राहकांना त्रास

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यातील पतसंस्थांनी बँकांच्या सहकार्याने आणि नंतर फिनटेक कंपन्यांमार्फत ग्राहकांसाठी क्यूआर कोड सेवा सुरू केली होती. मात्र रिझर्व्ह बँकेने पतसंस्थांच्या ग्राहकांची केवायसी अपडेट नसल्याचे कारण पुढे करत ही सुविधा देण्यास आक्षेप घेतला. त्यामुळे पतसंस्थांच्या व्यवसायावर मर्यादा आल्या आहेत. केवायसीचे नियम पूर्ण केलेल्या पतसंस्थांच्या ग्राहकांना क्यूआर कोड सेवा सुरू करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी केली जात आहे.**




बऱ्याच पतसंस्थांनी क्यूआर कोड सेवा सुरू केली होती. यामुळे व्यवहार वेगाने होऊ लागले होते. मात्र रिझर्व्ह बँकेने ही सेवा खंडित केल्याने त्याचा फटका बसला. काही सक्षम पतसंस्थांनी गेल्या दोन वर्षांत काही मोठ्या बँकांच्या सहकार्याने क्यूआर सेवा सुरू केली. परंतु काही पतसंस्थांमध्ये आर्थिक गैरव्यवहाराची प्रकरणे घडल्याने सगळ्या पतसंस्थांवर संशय घेतला गेला.आरबीआयच्या निर्देशानुसार नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय)कडून पतसंस्थांची क्यूआर कोड सेवा बंद करण्यात आली.क्यूआर सेवा सुरू केल्यास ग्राहक दररोज व्यवहार करतील. यामुळे खातेदार वाढतील. खातेदार वाढल्याने पतसंस्थांना स्वस्त दरात कर्ज देता येईल. आमच्या ४५ हजार ग्राहकांपैकी दहा हजारपेक्षा अधिक जण क्यूआर मागतात. काही अटी घालून पतसंस्थांना क्यूआर सेवा सुरू करण्यास एनपीसीआयने परवानगी द्यावी, ग्राहकांची शंभर टक्के केवायसी अपडेट करून देण्याची आमची तयारी आहे. क्यूआर कोड सुविधेमुळे पतसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली होती. कर्ज वसुली आणि ठेवींचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे पतसंस्थांना क्यूआर कोड सुविधा सुरू ठेवण्यास परवानगी द्यायला हवी. बऱ्याच पतसंस्थांनी क्यूआर कोड सेवा सुरू केली होती. यामुळे व्यवहार वेगाने होऊ लागले होते. मात्र रिझर्व्ह बँकेने ही सेवा खंडित केल्याने त्याचा फटका बसला. काही सक्षम पतसंस्थांनी गेल्या दोन वर्षांत काही मोठ्या बँकांच्या सहकार्याने क्यूआर सेवा सुरू केली.

### केवायसी अपडेट नसल्याचे कारण

परंतु काही पतसंस्थांमध्ये आर्थिक गैरव्यवहाराची प्रकरणे घडल्याने सगळ्या पतसंस्थांवर संशय घेतला गेला.आरबीआयच्या निर्देशानुसार नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय)कडून पतसंस्थांची क्यूआर कोड सेवा बंद करण्यात आली.क्यूआर सेवा सुरू केल्यास ग्राहक दररोज व्यवहार करतील. यामुळे खातेदार वाढतील. खातेदार वाढल्याने पतसंस्थांना स्वस्त दरात कर्ज देता येईल. आमच्या ४५ हजार ग्राहकांपैकी दहा हजारपेक्षा अधिक जण क्यूआर मागतात. काही अटी घालून पतसंस्थांना क्यूआर सेवा सुरू करण्यास एनपीसीआयने परवानगी द्यावी, ग्राहकांची शंभर टक्के केवायसी अपडेट करून देण्याची आमची तयारी आहे. क्यूआर कोड सुविधेमुळे पतसंस्थांच्या आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली होती. कर्ज वसुली आणि ठेवींचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे पतसंस्थांना क्यूआर कोड सुविधा सुरू ठेवण्यास परवानगी द्यायला हवी.

# अंतराळातून भारत नेमका कसा दिसतो?

## पंतप्रधान मोदींशी बोलताना शुभांशू शुक्ला यांनी केलं वर्णन

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात जाणारे पहिले भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्याशी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवाद साधला. या दोघांच्या संवादाचा व्हिडीओ देखील शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये शुभांशू शुक्ला हे पंतप्रधान मोदी यांनी अंतराळात त्यांनी अनुभवलेल्या गोष्टींबद्दल माहिती देताना दिसत आहेत. यावेळी अंतराळातून भारत कसा दिसतो याबद्दल देखील शुक्ला यांनी पंतप्रधान मोदींना सांगितले.**



या संभाषणादरम्यान अंतराळाची विशालता पाहून डोक्यात सर्वात पहिला विचार काय आला होता? असा प्रश्न पंतप्रधान मोदी यांनी शुभांशू यांना विचारला. यावेळी गुप्ता यांनी उत्तर देताना सांगितले की,"जेव्हा आम्ही पहिल्यांदा अंतराळात पोहचलो तेव्हा पहिले दृष्य हे प्रथ्वीचे होते. पृथ्वीला बाहेरून पाहून पहिला विचार हा आला की, पृथ्वी पूर्णपणे एक दिसते. बाहेरून कोणतीही सीमारेषा दिसत नाही. दुसरी गोष्ट लक्षात येत होती, जेव्हा पहिल्यांदा भारताला पाहिले... जेव्हा आपण भारताला पाहतो तेव्हा नकाशावर पाहतो, आपण पाहतो की दुसऱ्या देशांचा आकार किती मोठा आहे आणि आपल्या देशाचा आकार किती आहे. ते आपण नकाशावर पाहतो, पण ते योग्य नसते. कारण आपण एका थ्री-डी वस्तुला टू-डी म्हणजे कागदावर रेखाटलेले असते. भारत खरंच खूप भव्य, खूप मोठा दिसतो. जितका आपण नकाशावर पाहतो त्यापेक्षा खूप मोठा..." असे शुभांशू यांनी पंतप्रधान मोदी यांना सांगितले. पुढे बोलताना शुभांशू म्हणाले की, "...जी पृथ्वीच्या एकतेची (ONENESS) भावना आहे, जे आपलं बोधवाक्य देखीलआहे की 'अनेकता मे एकता', त्याचं महत्व बाहेरून (पृथ्वीला) पाहिल्यानंतर लक्षात येतं. असं वाटतं की कोणती सीमा, राज्य, देश अस्तित्वातच नाहीत. आपण सगळे मानवतेचा भाग आहोत आणि पृथ्वी हे आपलं घर आणि आपण सर्वजण याचे नागरिक आहोत."ॲक्सिओम-४ मोहिमेचे मिशन पायलट असलेले शुक्ला हे आंतरराष्ट्रीय स्पेश स्टेशनवर जाणारे पहिले भारतीय आणि १९८४ मध्ये राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात प्रवास करणारे दुसरे भारतीय आहेत. शुक्ला हे ॲक्सिओम-४ मोहिनेचे वैमानिक आहेत, जे नासाच्या फ्लोरिडा येथील केनडी स्पेस सेंटरवरून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाडे बुधवारी झेपावले होते. शुभांशु शुक्ला स्पेसएक्स ड्रॅगन या अंतराळ यानातून १४ दिवसांसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक आयएसएसवर गेले आहेत. तसेच ॲक्सिओम-४ मोहिमेसाठी मंजूर झालेल्या सात भारतीय प्रयोगांपैकी एक 'व्हॉयेजर टार्डिग्रेड्स' हा प्रयोग अशून सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाच्या परिस्थितीत या सूक्ष्म जीवांचा अभ्यास प्रयोगामध्ये केला जाणार आहे. आयएसएसवर केला जाणारा व्हॉयेजर टार्डिग्रेड्स प्रयोग हा पूर्वीच्या अभ्यासांवर आधारित आहे. या संभाषणादरम्यान अंतराळाची विशालता पाहून डोक्यात सर्वात पहिला विचार काय आला होता? . यावेळी गुप्ता यांनी उत्तर देताना सांगितले की, "जेव्हा आम्ही पहिल्यांदा अंतराळात पोहचलो तेव्हा पहिले दृष्य हे प्रथ्वीचे होते.

### ISS वर जाणारे पहिले भारतीय

पृथ्वीला बाहेरून पाहून पहिला विचार हा आला की, पृथ्वी पूर्णपणे एक दिसते. बाहेरून कोणतीही सीमारेषा दिसत नाही. दुसरी गोष्ट लक्षात येत होती, जेव्हा पहिल्यांदा भारताला पाहिले... जेव्हा आपण भारताला पाहतो तेव्हा नकाशावर पाहतो, आपण पाहतो की दुसऱ्या देशांचा आकार किती मोठा आहे आणि आपल्या देशाचा आकार किती आहे. ते आपण नकाशावर पाहतो, पण ते योग्य नसते. कारण आपण एका थ्री-डी वस्तुला टू-डी म्हणजे कागदावर रेखाटलेले असते. भारत खरंच खूप भव्य, खूप मोठा दिसतो. जितका आपण नकाशावर पाहतो त्यापेक्षा खूप मोठा..." असे शुभांशू यांनी पंतप्रधान मोदी यांना सांगितले.पुढे बोलताना शुभांशू म्हणाले की,त्याचं महत्व बाहेरून (पृथ्वीला) पाहिल्यानंतर लक्षात येतं.

# समाजवाद शब्दांनी सनातनचा अवमान!

## घटनेच्या प्रास्ताविकेतील समावेशावरून उपराष्ट्रपतींची टीका

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**राज्यघटनेची प्रास्ताविका बदलण्यायोग्य नाही, परंतु आणीबाणीच्या काळात ती बदलण्यात आली. ही कृती घटनाकारांच्या सुज्ञपणावर विश्वासघात दर्शविते. राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत 'समाजवाद', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'अखंडता' हे शब्द जोडून सनातनच्या भावनेचा अपमान करण्यात आला, अशी टीका उपराष्ट्रपती जगदीप धडखड यांनी शनिवारी केली.**



दिल्लीतील एका कार्यक्रमाला संबोधित करताना उपराष्ट्रपती म्हणाले की, प्रास्ताविका ही कोणत्याही संविधानाचा आत्मा आहे आणि भारताशिवाय इतर कोणत्याही देशाने ती बदलली नाही. प्रास्ताविका हे राज्यघटनेचे बीज आहे, त्याच्या आधारावर संविधान वाढले आहे. मात्र भारतीय राज्यघटनेची ही प्रास्ताविका १९७६च्या ४२ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे बदलण्यात आली, ज्यामध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता हे शब्द जोडले गेले, असे उपराष्ट्रपतींनी सांगितले.१९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लादलेली आणीबाणी हा देशाच्या राज्यघटनेसाठी सर्वात काळा काळ होता. प्रास्ताविका ही राज्यघटनेची आत्मा असतानाही नवे शब्द जोडून राज्यघटनेचा आत्मा बदलण्यात आला, अशी टीका धनखड यांनी केली. नव्याने जोडण्यात आलेले शब्द चिघळणारी जखम आहे आणि सनातनच्या भावनेचा अपमान आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबाळे यांनी 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द प्रास्ताविकेत राहावेत की नाही यावर चर्चा झाली पाहिजे असे म्हटल्यानंतर दोन दिवसांनी उपराष्ट्रपतींनी आपले मत मांडले. केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि डॉ. जितेंद्र सिंह यांनीही शुक्रवारी होसबाळे यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला होता जोडण्याबाबत संघाने घेतलेल्या भूमिकेला पाठिंबा देत भाजपनेही शनिवारी कॉंग्रेसवर टीका केली.

### उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित

राज्यघटनेच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या विधानांचा आणि त्यात बदल करण्याच्या त्यांच्या दाव्याचा उल्लेख भाजपने केला. भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी त्या काळातील माध्यमांच्या वृत्तांचा हवाला देऊन इंदिरा गांधी यांनी त्यांच्या पत्रकार परिषदेत आणि भाषणातून संविधानावर टीकात्मक भूमिका मांडली होती, अशी टीका केली.दिल्लीतील एका कार्यक्रमाला संबोधित करताना उपराष्ट्रपती म्हणाले की, प्रास्ताविका ही कोणत्याही संविधानाचा आत्मा आहे आणि भारताशिवाय इतर कोणत्याही देशाने ती बदलली नाही. प्रास्ताविका हे राज्यघटनेचे बीज आहे, त्याच्या आधारावर संविधान वाढले आहे. मात्र भारतीय राज्यघटनेची ही प्रास्ताविका १९७६च्या ४२ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे बदलण्यात आली

# हिंदी सक्तीविरोधात केदार शिंदेंची लक्षवेधी पोस्ट




राज्य मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना हिंदी ही तिसरी भाषा म्हणून शिकवली जाणार आहे. म्हणजेच, पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती रद्द केली असली तरी पाचवीपर्यंत हिंदी ही 'तिसरी भाषा' म्हणून शिकणं बंधनकारक राहणार आहे. हिंदीऐवजी इतर भाषा शिकायची असेल तर २० हून अधिक विद्यार्थी इच्छुक हवेत, अशी माहिती देण्यात आली आहे. याविरोधात आता जनतेतून संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयावर आता विविध स्तरांतून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत.हेमंत ढोमे, सयाजी शिंदे, तेजस्विनी पंडित यांसारख्या मराठी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी गेल्या काही दिवसांत हिंदी सक्तीला जाहीर विरोध करत आपली स्पष्ट मतं सोशल मीडियावर मांडली आहेत..शाळेतील हिंदी भाषा सक्तीवर मराठी कलाविश्वातील लोकप्रिय दिग्दर्शक केदार शिंदे यांनी देखील इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. "पहिली ते चौथीच्या बाळांना मनाप्रमाणे जगू द्या, त्यांना CONFUSE करू नका" असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. केदार शिंदे पोस्ट शेअर करत म्हणतात, "ठेच लागल्यावर "आई गं!" म्हणायचं की, "ओ मेरी माँ..." यात पहिली ते चौथीच्या बाळांना CONFUSE करू नका...त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे जगू द्या! हिंदी सक्ती नकोच...जय महाराष्ट्र"दरम्यान, हिंदी भाषा सक्तीबद्दलच्या निर्णयाबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेना आधीपासूनच आक्रमक असल्याचं पाहायला मिळत आहे. राज ठाकरे यांनी २६ जून रोजी पत्रकार परिषद घेत हिंदीसक्ती विरोधात मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे.

# 22 व्या वर्षी लग्न अन् 5 वर्षांत मोडला संसार

'कांटा लगा गर्ल', बिग बॉस १३ फेम शेफाली जरीवालाने वयाच्या ४२ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. २७ जून रोजी रात्री उशिरा तिच्या मृत्यूची बातमी आली. शेफालीला तिचा पती पराग त्यागी आणि इतर तीन जण मुंबईतील बेलेव्ह्यू मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले होते, परंतु तिला मृत घोषित करण्यात आलं. तिच्या निधनंतर पराग हॉस्पिटलमधून घरी गेला आणि पोलीस तपासात सहकार्य केलं. दुसरीकडे पराग व शेफालीचे कुटुंबीय रुग्णालयात पोहोचले. पराग व शेफाली एकमेकांवर प्रचंड प्रेम करायचे. शेफाली नेहमी परागवरचं प्रेम व्यक्त करताना दिसायची. दोघांची प्रेमकहाणी खूप खास होती. पराग हा शेफालीचा दुसरा पती होता. शेफालीचं पहिलं लग्न MEET BROTHERS जोडीतील हरमीत सिंगशी झालं होतं. शेफालीने अवघ्या २२ व्या वर्षी २००४ मध्ये हरमीतशी लग्न केलं होतं, पण त्यांचं नातं फक्त ५ वर्षे टिकलं. २००९ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतर शेफालीचा प्रेमावरचा विश्वास उडाला. पुन्हा कधीच कुणावर प्रेम करू शकणार नाही, असं शेफालीला वाटायचं.घटस्फोट घेताना शेफालीने हरमीतवर घरगुती हिंसाचाराचे गंभीर आरोप केले होते. तसेच या नात्यात भावनिक आदर मिळाला नाही, ज्यामुळे मानसिक तणावाखाली असल्याचं शेफालीने म्हटलं होतं. "तुमचं कौतुक होत नसेल, आदर केला जात नसेल अशा नात्यात असणं योग्य नाही. सर्व हिंसाचार शारीरिक नसतात, मानसिक हिंसाचारही खूप होतो आणि जेव्हा तुम्ही त्या हिंसाचारात जगत असता तेव्हा खूप दुःखी असता," असं एका मुलाखतीत शेफाली म्हणाली होती. शेफाली व पराग यांची भेट तिच्या एका मित्राच्या पार्टीत झाली होती. पराग 'पवित्र रिश्ता' करत होता, त्याचबरोबर चित्रपटांमध्येही काम करत होता. त्या पार्टीत पराग व शेफालीची मैत्री झाली होती. तिला पराग आवडला, पण तिने प्रेमात पडायचं नाही असं ठरवलं.



# तृप्ती आता 'आशिकी ३'मध्ये काम करणार नाही

'बिग बॉस १७' हा शो अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शोच्या ग्रँड फिनालेला अवघे चार दिवस बाकी आहेत. अंकिता लोखंडेचा पती या शोच्या फिनालेमध्ये पोहोचू शकला नाही. मुनव्वर फारुकी, मनारा चोप्रा, अभिषेक कुमार, अरुण महाशेट्टी व अंकिता लोखंडे हे टॉप पाच स्पर्धक फिनालेमध्ये पोहोचले आहेत. मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर तिची बहीण व बॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राने तिच्यासाठी पोस्ट शेअर केली आहे. प्रियांका चोप्रा ही मनारा चोप्राची मामेबहीण आहे. मनारा या शोमध्ये सहभागी झाल्यानंतरही प्रियांकाने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करत मनाराला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आता मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर प्रियांकाने तिचा एक फोटो पोस्ट करत तिचं अभिनंदन केलं आणि तिच्यासाठी मेसेज पाठवला आहे.प्रियांका चोप्राने मनाराचा बिग बॉसमधील एक फोटो स्टोरीला शेअर केला. "आपलं बेस्ट दे आणि बाकी सगळं विसरून जा," असं कॅप्शन दिलं आहे. तिने मनारा चोप्राला टॅग करत रेड हार्ट इमोजीही पोस्ट केला आहे. यासोबत प्रियांकाने मिताली आणि तिच्या आईलाही टॅग केलं आहे.काही दिवसांपूर्वी प्रियांका चोप्राची आई मधु चोप्रा यांनीही 'बिग बॉस १७' मधील स्पर्धक मनारासाठी एक व्हिडीओ शेअर केला होता.



# मला फक्त आशिष शेलार माहिती आहेत

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या चर्चा आहे ती राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येण्याची! येत्या ५ जुलै रोजी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार आहेत. राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या घेतलेल्या निर्णयाला विरोध करण्यासाठी दोन्ही ठाकरे बंधू मुंबईत एका मोर्चाच्या निमित्ताने एकत्र येणार आहेत. पण त्याहीपुढे ते राजकारणात कायमस्वरूपी एकत्र येतील का? किंवा त्यांच्यात युती होईल का? यावर तर्क-वितर्क लावले जात आहेत. यासंदर्भात आता ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांची प्रतिक्रिया आली आहे. आपल्याला राजकारणात फक्त आशिष शेलारच माहिती आहेत, असं आशा भोसले म्हणाल्या आहेत.

# मटण खाणं माझी वैयक्तिक आवड

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वातून घराघरांत लोकप्रिय झालेला स्पर्धक म्हणजे डीपी अर्थात धनंजय पोवार. आपल्या विनोदी स्वभावाने डीपीने अनेकांची मनं जिंकली. धनंजय सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. सोशल मीडियावर तो आपल्या आई व बायकोबरोबरचे मजेशीर व्हिडीओ शेअर करतो. त्याच्या व्हिडीओला नेटकऱ्यांकडूनही चांगलाच प्रतिसाद मिळत असतो.डीपी आणि त्याचं मटण प्रेम हे सर्वांनाच माहीत आहे. सोशल मीडियावरील काही व्हिडीओमधून त्याच्या प्रेक्षकांना ते अनेकदा पाहायला मिळालं आहे. यामुळे त्याला अनेकदा ट्रोलिंगचा सामनाही करावा लागला आहे. अशातच डीपी वारीत सहभागी झाल्यानंतर अनेकजण त्याला मटण खाण्यावरून ट्रोल करत आहेत आणि या ट्रोलर्सना डीपीने स्पष्ट शब्दांत उत्तरही दिलं आहे.



# स्मृती मानधनाची बॅट तळपली!

## इंग्लंडविरोधात अवघ्या 51 चेंडूंत झळकावलं शतक

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लंड महिला संघांतील पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेला आज, शनिवारपासून सुरुवात झाली आहे. या मालिकेच्या पहिल्याच सामन्यात भारतीय महिला क्रिकेटपटू स्मृती मानधनाने पुन्हा एकदा ऐतिहासिक कामगिरी केली आहे. इंग्लंडविरोधातील या टी२० क्रिकेट सामन्यात तिने अवघ्या ५१ चेंडूत शतक झळकावले आहे. याबरोबरच ती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिन्ही प्रकारात शतक साकारणारी पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. आंतरराष्ट्रीय टी२० क्रिकेटमध्ये भारतीय महिला फलंदाजाने केलेले हे दुसरेच शतक आहे. याआधी हरमनप्रीत कौरने २०१८ मध्ये शतकी खेळी साकारली होती.**




दरम्यान डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात उतरलेल्या मानधनाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत इंग्लिश गोलंदाजीवर वर्चस्व गाजवले. पावरप्लेचा पुरेपूर फायदा करून घेत तिने आक्रमक खेळ दाखवला. तिने तिच्या डावाची सुरूवातच एक चौकार लगावून केली आणि पुढे फलंदाजीची हीच गती कायम राखली.ट्रेंट ब्रिज येथे सुरू असलेल्या या टी२० सामन्यात कर्णधार मानधनाने ६२ चेंडूत ११२ धावा केल्या. ही धावसंख्या टी२० सामन्यात भारतीय महिला खेळाडूने आजवर केलेले सर्वाधिक धावसंख्या आहे. या खेळीत तिने १५ चौकार आणि तीन षटकार लगावले. मानधनाच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने पहिल्यांदा फलंदाजी करत ५ गडी गमावून २१० धावा उभारल्या.मानधनाचे हे १४ वे आंतरराष्ट्रीय शतक आहे. तिने यापूर्वी एकदिवसीय क्रिकेटमध्ये ११ शतक नावावर केले आहेत, हे भारतीय खेळाडूसाठी एक रेकॉर्ड आहे. तर तिच्या नावावर कसोटीत दोन शतके आहेत. या खेळीदरम्यान मानधनाने ५० धावांचा टप्पा ओलांडताच टी२० क्रिकेटच्या इतिहासात इंग्लंडविरोधात सर्वाधिक वेळा ५०प्लस धावा करण्याच्या बेथ मूनीच्या विक्रमाची बरोबरी केली. ऑस्ट्रेलियाची कर्णधार बेथच्या नावावर इंग्लंडविरोधात ८ वेळा पन्नास पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम आहे, आता मानधना देखील तिच्या बरोबरीला पोहचली आहे.या सामन्यात मानधना आणि शफाली यांनी मिळून अजून एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. या दोघींनी ऑस्ट्रेलियन खेळाडू ॲलीसा हेली आणि बेथ मूनी यांच्या नावावर असलेला वीस ५०प्लस भागिदारी रचण्याचा विक्रम मोडला आहे. आता हा विक्रम मानधना आणि शफाली यांच्या नावावर आहे.दरम्यान डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात उतरलेल्या मानधनाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत इंग्लिश गोलंदाजीवर वर्चस्व गाजवले. पावरप्लेचा पुरेपूर फायदा करून घेत तिने आक्रमक खेळ दाखवला. तिने तिच्या डावाची सुरूवातच एक चौकार लगावून केली आणि पुढे फलंदाजीची हीच गती कायम राखली.ट्रेंट ब्रिज येथे सुरू असलेल्या या टी२० सामन्यात कर्णधार मानधनाने ६२ चेंडूत ११२ धावा केल्या. ही धावसंख्या टी२० सामन्यात भारतीय महिला खेळाडूने आजवर केलेले सर्वाधिक धावसंख्या आहे. या खेळीत तिने १५ चौकार आणि तीन षटकार लगावले.जोरावर भारताने पहिल्यांदा फलंदाजी करत ५ गडी गमावून २१० धावा उभारल्या.

### इंग्लंडविरोधात 50 हून अधिक धावा

मानधनाचे हे १४ वे आंतरराष्ट्रीय शतक आहे. तिने यापूर्वी एकदिवसीय क्रिकेटमध्ये ११ शतक नावावर केले आहेत, हे भारतीय खेळाडूसाठी एक रेकॉर्ड आहे. तर तिच्या नावावर कसोटीत दोन शतके आहेत.या खेळीदरम्यान मानधनाने ५० धावांचा टप्पा ओलांडताच टी२० क्रिकेटच्या इतिहासात इंग्लंडविरोधात सर्वाधिक वेळा ५०प्लस धावा करण्याच्या बेथ मूनीच्या विक्रमाची बरोबरी केली. ऑस्ट्रेलियाची कर्णधार बेथच्या नावावर इंग्लंडविरोधात ८ वेळा पन्नास पेक्षा जास्त धावा करण्याचा विक्रम आहे, आता मानधना देखील तिच्या बरोबरीला पोहचली आहे.या दोघींनी ऑस्ट्रेलियन खेळाडू ॲलीसा हेली आणि बेथ मूनी यांच्या नावावर असलेला वीस ५०प्लस भागिदारी रचण्याचा विक्रम मोडला आहे. आता हा विक्रम मानधना आणि शफाली यांच्या नावावर आहे.

---

# मी गर्लफ्रेंडला गुपचूप टीम हॉटेलमध्ये आणायचो

## शिखरने त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल गोष्टी पुस्तकात लिहिल्या

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय क्रिकेट संघाचा स्टार सलामीवीर शिखर धवनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. पण सध्या तो सोशल मीडियावर सक्रिय असल्याने चर्चेत असतो. यादरम्यान शिखर धवनने त्याच्या 'द वन: क्रिकेट, माय लाईफ अँड मोर' या आत्मचरित्रात काही वैयक्तिक किस्से शेअर केले आहेत. दरम्यान त्याच्या रिलेशनशिपबद्दल आणि त्यादरम्यान रोहित शर्माच्या प्रतिक्रियेबाबत सांगितलं आहे.**

२००६ मध्ये भारत अ संघाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान धवनने त्याच्या रिलेशनशिपबद्दल काही धक्कादायक खुलासे केले होते. धवनने भारतीय संघातून बाहेर धाल्यानंतर एक पुस्तक लिहिलं आहे. या पुस्तकात धवनने त्याच्या कारकिर्दीतील अनेक प्रसंग सांगितले आहेत. या पुस्तकात, धवनने त्याच्या प्रेयसीला त्याच्या हॉटेलच्या खोलीत गपचूप कसं आणायचा याबद्दलचा जुना किस्से सांगितला आहे.शिखर धवन जेव्हा टीम इंडियामधून खेळत असे, तेव्हा तो रोहित शर्माबरोबर त्याची खोली शेअर करायचा. यावेळी त्याने खुलासा केला की रोहितला त्याची प्रेयसी त्यांच्या खोलीत येणं अजिबात आवडत नव्हतं. त्याने हे देखील सांगितले




की त्यांच्या नात्याची बातमी संपूर्ण संघातील खेळाडूंमध्ये कशी पसरली होती.धवनने त्याच्या पुस्तकात लिहिलं आहे, “ती खूप सुंदर होती आणि मी अचानक पुन्हा प्रेमात पडलो. मी असा विचार केला की ती माझ्यासाठीच बनलेली आहे आणि मी तिच्याशी लग्न करण्यासाठी तयार झालो होतो.” २००६ मध्ये भारत अ संघाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर धवनने उत्कृष्ट कामगिरी केली होती. परंतु त्याने कबूल केलं की तो त्याच्या मैत्रिणीबरोबर जास्त वेळ घालवू लागल्याने तो प्रेमात पडू लागला. जिला तो एलेन असं म्हणत असे.धवनने किस्सा सांगताना लिहिलंय, “मी सराव सामन्यात अर्धशतकाने सुरुवात केली आणि दौरा चांगला चालला होता. प्रत्येक सामन्यानंतर, मी एलनला भेटायचो आणि मग तिला मी आमच्या हॉटेल रूममध्ये घेऊन जाऊ लागलो, जिथे मी रोहित शर्माबरोबर खोली शेअर करायचो. कधीकधी रोहित हिंदीत तक्रार करायचा, “तू मला झोपू देशील का?” रोहित शर्माला त्याची गर्लफ्रेंड रूममध्ये येणं आवडत नसे आणि त्यामुळे तो वैतागून हे बोलायचा.संपूर्ण संघाला धवनच्या नात्याबद्दल कळलं जेव्हा भारताच्या टीम सिलेक्टरने त्याला त्याच्या मैत्रिणीसोबत पाहिलं. धवन पुढे म्हणाला की, “एके संध्याकाळी मी एलनबरोबर जेवत होतो आणि ती माझ्या खोलीत असल्याची बातमी संपूर्ण संघात वाऱ्यासारखी पसरली.

### मी कोणताही गुन्हा करत नव्हतो

आमच्यासह दौऱ्यावर असलेल्या एका वरिष्ठ राष्ट्रीय निवडकर्त्याने आम्हाला लॉबीमध्ये हातात हात घालून चालताना पाहिलं. मला त्यावेळी तिचा हात सोडावा असं वाटलं नाही, कारण मी कोणताही गुन्हा करत नव्हतो.”र शिखर धवनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 29 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292